Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 6, June - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 01/06/2021 Accepted on : 14/06/2021 Publication Date: 30/06/2021

# गुप्तकालीन भारतातील सुवर्ण युग

**राजेश सोनकुसरे**
सहाय्यक प्राध्यापक (इतिहास) महर्षि शरद पवार कला व वाणिज्य महाविद्यालय
रा.स.तु.म. नागपुर विद्यापीठ, नागपुर
E-mail - rmsonkusare99@gmail.com

**सारांश:** प्रचिन भारतात मौर्य साम्राज्याच्या पतना नंतर जवळ जवळ 500 वर्षांनी तीस–या शतकात उत्तर भारतात गुप्त साम्राज्याची स्थापना झाली. गुप्त सम्राटांनी 200 वर्षांपेक्षा अधिक काळ भारतात राज्य केले. त्यांच्या या कारकीर्दीस इतिहासकार "गुप्तकाळ" ही सर्वसाधारण संज्ञा देतात. गुप्त राजवंशात अनेक प्रतापी व कर्तूत्ववान सम्राट झालेत. यात चंद्रगुप्त प्रथम, समुद्रगुप्त, चंद्रगुप्त द्वितीय (विक्रमादीत्य), कुमारगुप्त, स्कंदगुप्त हे प्रमुख सम्राट होते. या प्रतापी गुप्त सम्राटांच्या कारकिर्दीत भारतात स्थापत्यकला, मुर्तिकला, चित्रकला, साहित्य, विज्ञान, धातूशास्त्र या सारख्या अनेक क्षेत्रात लक्षनीय प्रगती झाली. त्यामुळेच इतिहासकार या युगाला "सुवर्ण युग" म्हणून संबोधितात. या युगाला "क्लासीकल युग" किंवा "पेरीक्लीन युग" म्हणून सुद्धा संबोधितात.

गुप्त सम्राटांनी आपल्या शौर्याने विशाल साम्राज्याचे रक्षण केले. शिवाय गुप्त सम्राटांची प्रशासकीय व्यवस्था अतिशय उत्तम व जनतेसाठी हीतकारी होती. त्यामुळे राज्यातील जनता सुखी होती. शिवाय गुप्त सम्राटांनी आपल्या राज्यात प्रत्येक कलेला व कलाकारांना प्रांत्साहन दिले. त्यामुळे भारताच्या इतिहासात एकदाच सुवर्ण युग आले व ते गुप्तसम्राटांच्या 200 वर्षांपेक्षा अधिक काळात.

**प्रमुख शब्द:** गुप्तकाळ, चंद्रगुप्त प्रथम, चंद्रगुप्त द्वितीय विक्रमादीत्य, समुद्रगुप्त, कालीदास, नागार्जुन.

## 1. प्रस्तावना:

प्रचिन भारतातील प्रथम विशाल साम्राज्याची स्थापना चंद्रगुप्त मौर्य याने केली. त्याने सिकंदरचे भारतावरील आक्रमन परत गेल्यानंतर धनानंद या नंद राजाचा पराभव करून उत्तर भारतात आपली सत्ता प्रस्तापीत केली. मौर्य वंशात चंद्रगुप्त मौर्य, बिंदूसार व सम्राट अशोक हे बलाढय सम्राट झालेत , ज्यांनी संपूर्ण भारतात साम्राज्यविस्तार केला. कलिंगच्या युद्धात विजयी झाल्यावर सम्राट अशोक हा भारतातील प्रथम चक्रवर्ती सम्राट झाला. मात्र कलिंगच्या युद्धातील हिंसा बघून सम्राट अशोकाचे मन परिवर्तन झाले. त्याने बौद्ध धर्म स्विकारला व अहिंसावादी धोरण अवलंबीले. मात्र या अहिंसावादी धोरणामुळेच पुढे मौर्य साम्राज्याचे पतन झाले. मौर्य साम्राज्याच्या पतनानंतर जवळ जवळ 500 वर्षानंतर उत्तर भारतात गुप्त साम्राज्याची स्थापना झाली. गुप्त राजांनी इ.स. 319 ते इ.स. 550 पर्यंत भारतातील अधिकांश भागावर राज्य केले. या काळास गुप्त काळ म्हणून संबोधितात. गुप्त काळाचे मुख्य वैशिष्य म्हणजे गुप्त काळातच भारतात सर्वप्रथम व आजपर्यंत एकदाच सुवर्णयुग आले होते. म्हणून गुप्त काळास भारतातील सुवर्णयुग म्हणतात.

## 2. सुवर्ण युग:

सुवर्ण युग त्या युगास म्हणतात ज्या युगात किंवा काळात धर्म, कला, साहित्य, ज्ञान-विज्ञान इत्यादी क्षेत्रात देशाची अद्भूत प्रगती होते. शिवाय सर्वसाधारण जनता व समाज शासकाच्या कार्यामुळे समाधानी असते.

गुप्त सम्राटांच्या शासन काळात भारतीय सभ्यता व संस्कृतीच्या प्रत्येक क्षेत्रात लक्षणीय प्रगती झाली. भारतात हिंदू संस्कृती आपल्या सर्वोच्च बिंदू पर्यंत पोहचली होती. गुप्त काळात करांचे प्रमाण सौम्य स्वरूपाचे होते. तर जनतेला राज्यामार्फत सुखसुविधा अधिक प्राप्त व्हायच्या. शिवाय गुप्त काळातील प्रत्येक क्षेत्रातील जसे कला, साहित्य, ज्ञान-विज्ञान इत्यादी मधील प्रगती लक्षात घेऊन या काळाला इतिहासकार "स्वर्णयुग" म्हणून संबोधीत करतात. यालाच "क्लसिकल युग" किंवा "पेरीक्लीन युग" सुद्धा म्हणतात. गुप्त काळ हा प्रतापी सम्राटांच्या कार्यांनी व सर्वोत्कृष्ट संस्कृती मुळे भारतीय इतिहासात स्वर्णाक्षरांनी नमूद करण्यात आलेला आहे.

**3. गुप्त साम्राज्यातील प्रतापी सम्राट:**

गुप्त राजांमध्ये सर्वप्रथम श्रीगुप्तचा उल्लेख मिळतो. त्यानंतर त्याचा पुत्र घटोत्कच गुप्त राजा झाला. परंतू त्यानंतर झालेल्या चंद्रगुप्त प्रथम, समुद्रगुप्त, चंद्रगुप्त द्वितीय (विक्रमादीत्य), कुमारगुप्त, स्कंदगुप्त या प्रतापी सम्राटांच्या उत्कृष्ट प्रशासनामुळे गुप्त काळ स्वर्णयुग म्हणून प्रसिद्ध झाला.

- **चंद्रगुप्त प्रथम:**

चंद्रगुप्त प्रथम याला गुप्त साम्राज्याचा वास्तविक संस्थापक मानतात. चंद्रगुप्त प्रथम चा राज्याभिषेक इ.स. 319 मध्ये झाला व गुप्त सवंत चा प्रारंभ झाला. चंद्रगुप्त प्रथम याने इ.स. 319 ते इ.स. 350 पर्यंत राज्य केले.

- **समुद्रगुप्त:**

चंद्रगुप्त प्रथम नंतर त्याचा मुलगा समुद्रगुप्त हा इ.स. 350 मध्ये सम्राट झाला. सम्राट अशोका नंतर भारतातील दुसरा व अखेरचा चक्रवर्ती सम्राट होण्याचा मान सम्राट समुद्रगुप्त यालाच जातो. समुद्रगुप्त याने उत्तर व दक्षिण भारतात विजयी अभियान यशश्वरीत्या पुर्ण केले. समुद्रगुप्त कधीही पराभूत झाला नाही व सम्राट अशोका नंतर भारतात विशाल साम्राज्य स्थापीत करणारा दुसरा सम्राट बनला.

- **चंद्रगुप्त द्वितीय (विक्रमादीत्य):**

समुद्रगुप्त नंतर त्याचा थोरला मुलगा राम गुप्त सम्राट झाला. त्याने इ.स. 375 ते इ.स. 380 पर्यंत राज्य केले. मात्र तो भेकड व अपयशी शासक होता व शक राजा रूद्रसेन तृतीय च्या आक्रमनाचा सामना करण्या ऐवजी शरणागती पत्करल्याने त्याला ठार करून त्याचा लहान भाऊ व समुद्रगुप्तचा दुसरा मुलगा चंद्रगुप्त द्वितीय सम्राट झाला. चंद्रगुप्त द्वितीयने इ.स. 380 ते इ.स. 415 पर्यंत राज्य केले. चंद्रगुप्त द्वितीय ने त्या काळी बलाढय समजल्या जाणा–या शक राजा रूद्रसेन तृतीय च्या विशाल सेनेचा पराभव केला व रूद्रसेन तृतीय ला ठार करून शकांना भारतातून हद्दपार केले व भारताला क्रूर शकांपासून मुक्ती मिळवून दिली. शकां वरील विजया नंतर चंद्रगुप्त द्वितीय ने विक्रमादीत्य ही उपाधी धारण केली. शकांचा नाश केला म्हणून चंद्रगुप्त द्वितीय यास शाकारी चंद्रगुप्त सुद्धा म्हणतात.

- **कुमारगुप्त:**

कुमारगुप्त हा चंद्रगुप्त द्वितीय (विक्रमादीत्य) चा मुलगा इ.स. 415 ते इ.स. 455 पर्यंत गुप्त सम्राट होता. त्याच्या काळात पुष्पमित्र या बर्बर जातीने गुप्त साम्राज्यावर आक्रमण केले. या आक्रमणास कुमारगुप्तचा मुलगा स्कंदगुप्तने परतवून लावले.

- **स्कंदगुप्त:**

स्कंदगुप्त हा कुमारगुप्तचा मुलगा होता. त्याने इ.स. 455 ते इ.स. 467 पर्यंत राज्य केले. स्कंदगुप्त हा गुप्त साम्राज्याचा शेवटचा पराक्रमी व प्रभावी सम्राट होता.

**3.1 गुप्तकालीन कर प्रणाली व जनउपयोगी कार्ये:**

गुप्त सम्राटांना संपुर्ण साम्राज्याच्या भुमीचे स्वामी मानले जायचे. मात्र व्यवहारीक दृष्टया कृषक(शेतकरी) हाच भूमीचा खरा स्वामी होता. कृषी भुमीवर होणा–या उत्पन्नच्या आधारे त्याला राज्याला कर दयावा लागत असे. कृषी भुमीवर साधारणतः 6 वा भाग ते 4 था भाग कर घेतला जायचा. याच्या मोबदल्यात कृषकास राज्या कडून पाण्याची व्यवस्था व शेतीच्या प्रगतीला लागणा–या साधनांची पुर्ती करण्याचा प्रयत्न केला जायचा.
उदा. गुप्त सम्राट स्कंदगुप्तच्या काळात सौराष्ट्र प्रांतातील सुदर्शन झीलच्या नूतनीकरनाचे कार्य तेथील गुप्तांचा प्रशासक चक्रपालीतने केले होते. त्यामुळे त्या भागातील पाण्याची समस्या सोडवीण्यात आली.
या शिवाय इतर कर जसे व्यापारावरील कर व चुंगी कर सुद्धा घेतला जायचा. गुप्त सम्राटांनी व्यापाराला अधिकाधिक प्राधान्य दिले व त्यामुळे उद्योग धंदयांची अधिकाधिक प्रगती झाली.

**3.2 गुप्त सम्राटांची धर्मसहिष्णूता:**

गुप्त सम्राट प्रामुख्याने वैष्णव धर्मावलंबी होते. मात्र तरीही त्यांनी इतर धर्म जसे बौद्ध धर्म व जैन धर्म यांच्या प्रती सहिष्णू धोरणाचा अवलंब केला. हिंदू धर्मा व्यतिरीक्त इतर धर्मांचाही मान ठेवला. त्यामुळे गुप्त काळात सर्व धर्मांचा विकास झाला.

**3.3 गुप्त कालीन स्थापत्य कला:** गुप्त काळातच सर्वप्रथम मंदीर निर्माण करण्याच्या परंपरेचा प्रारंभ झाला. गुप्त काळात मंदीरांची निर्मीती ही दगडांद्वारे करण्यात येऊ लागली. त्यामुळे दगडांवर कोरीव काम करणा–या कारागीरांना

अधिकाधिक चालना मिळाली. गुप्त काळ म्हणजे हिंदू स्थापत्य कलेचा सुवर्ण युगाच होता. या काळी अनेक मंदीरांची निर्मीती झाली. जसे
देवगड येथील दशावतार मंदीर ,
भूमरा येथील शिव मंदीर ,
नचना कुठार येथील पार्वती मंदीर ,
भिरतगाव येथील विष्णू मंदीर ,
तिगवा येथील विष्णू मंदीर
ऐरण येथील विष्णू मंदीर ,
सिरपूर येथील लक्ष्मण मंदीर ,
साची येथील मंदीर ,
उदयगिरी येथील विष्णू मंदीर .... इत्यादी.

### 3.4 गुप्त कालीन मुर्तिकला:

मुर्तिकलेचा विकास व प्रगती प्रमुख्याने गुप्त काळातच झाली. मुर्तिंची निर्मीती प्रामुख्याने दगड, माती व धातू द्वारे होत असे. गुप्तकाळ हा स्थापत्य कलेप्रमाणे मुर्तिकलेचा सुद्धा सुवर्णकाळ होता. गुप्त काळी मुर्ति कलेची दोन प्रमुख केंद्रे होती. 1) मथुरा व 2) काशी
या काळी अनेक मुर्तिंची व लेण्यांची निर्मीती झाली. जसे
सारनाथ येथील बुद्ध मुर्ति ,
मथुरा येथील बुद्ध मुर्ति ,
सुल्तानगंज येथील बुद्ध मुर्ति ,
मथुरा येथील विष्णू मुर्ति ,
देवगड येथील दशावतार मंदीरातील मुर्ति ,
उदयगिरी पहाडा वरील विष्णूची वराह अवतार मुर्ति ,
मथुरा येथील महावीर जैन मुर्ति ... इत्यादी.

### 3.5 गुप्त कालीन चित्रकला:

गुप्तकाळात चित्रकलेचा सुद्धा विकास झाला. गुप्तकालीन चित्रकलेचे अवशेष त्या काळी निर्मीत झालेल्या मंदिरांच्या भिंतींवर तसेच अजंठा, बाघ, बदामी, कन्हेरी तथा औरंगाबाद येथील गुफांमध्ये पहायला मिळतात.

### 3.6 गुप्त कालीन साहित्य:

गुप्तकाळात साहित्य क्षेत्रात अभूतपुर्व प्रगती झालेली पहायला मिळाली. गुप्तकाळातच अनेक प्रसिद्ध साहित्य लिखान करण्यात आले. जसे नारद स्मृती, कात्यायन स्मृती, पराशर स्मृती, बृहस्पती स्मृती. तसेच रामायण आणि महाभारत या महाकाव्यांचे अंतिम स्वरूपात लिखान देखील गुप्तकाळातच करण्यात आले.

गुप्तकाळातील प्रसिद्ध साहित्यीक कालीदास व भास हे होते. त्यातील कालीदास हा चंद्रगुप्त द्वितीय विक्रमादीत्य च्या दरबारातील नवरत्नां पैकी एक होता. कालीदास ने रघुवंश, कुमार संभवम, मेघदूत, ऋतुसंहार या ग्रंथांची निर्मीती केली. तर मालविकाग्निमित्रम, विक्रमोवर्शीयम व अभिज्ञानशाकुन्तलम या तीन नाटकांचे लिखाण केले.

भास ने मध्यभव्ययोग, दूतवाक्य, बालचरीत, प्रतिभा अभिषेक, अविमार्क, प्रतिज्ञायौगन्धरायम, रूवप्रवासवदनम, चारूदत्त, दूतघटोत्कवच, कर्णभार, अरूभंग व पंचरात्र या ग्रंथांची निर्मीती केली.

विशाखादत्त याने मुद्राराक्षस, देवीचंद्रगुप्तम या ग्रंथांची निर्मीती केली.

या शिवाय अनेक ग्रंथांची निर्मीती गुप्तकाळात झाली.

### 3.7 गुप्त कालीन वैज्ञानिक प्रगती:

गुप्तकाळात विज्ञानाच्या विभीन्न शाखांमध्ये उल्लेखनीय प्रगती झाली. यात गणित, खगोलीय शास्त्र, ज्योतिष्य शास्त्र व चिकीत्सा विज्ञानात उच्चकोटीची प्रगती झाली.

गुप्तकाळात अनेक वैज्ञानिक होऊन गेलेत. जसे आर्यभट्ट, वराहमिहीर, ब्रम्हगुप्त.

Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 6, June - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 01/06/2021 Accepted on : 14/06/2021 Publication Date: 30/06/2021

**आर्यभट्ट:**
आर्यभट्ट हा गुप्त कालीन महान गणितज्ञ व खगोलीय शास्त्रज्ञ होता. आर्यभट्टने आर्यभट्टीय, दशगीतिका, आर्यभट्ट सिद्धांत सारख्या ग्रंथांची निर्मीती केली. आर्यभट्टने युरोपीयन वैज्ञानीकांनी सांगीतलेल्या पृथ्वी स्वतःच्या कक्षेत फीरते व त्याचमुळे पृथ्वीवर दिवस व रात्र होतात. हा कोपरनिकस या युरोपियन शास्त्रज्ञाचा सिद्धांत हजार वर्षांपुर्वीच सिद्ध करून दाखवीला होता व आपल्या ग्रंथात लिहून ठेवला होता. जगातील प्रथम महान गणितज्ञ म्हणून सुद्धा आर्यभट्टचे नाव घेतले जाते.

**वराहमिहीर:**
वराहमिहीर हा गुप्तकाळातील दुसरा गणितज्ञ व ज्योतिष्यी होता. वराहमिहीरने वृद्धसंहिता, पंचसिद्धान्तीका, वृद्धजातक, लघुजातक, विवाहपटल व भोगयात्रा हे प्रसिद्ध ग्रंथ लिहीले.
वराहमिहीरचा मुलगा **"पृथुयहा"** याने ज्योतिष्य शास्त्रावर षट्पंचशिका नामक ग्रंथ लिहीला.

**ब्रम्हगुप्त:**
ब्रम्हगुप्त हा गुप्तकालीन प्रमुख खगोलीय वैज्ञानिक होता. ब्रम्हगुप्तने ब्रम्हसिद्धांत, खंडखाद्य, ध्ययनाग्रह या ग्रंथांची निर्मिती केली. ब्रम्हगुप्तने न्यूटनच्या कित्तेक वर्षांआधीच गुरूत्वाकर्षण सिद्धांताचा शोध लावला होता.

**3.8 गुप्त कालीन चिकीत्सा पद्धतीचा विकास:**
गुप्तकाळात आयुर्वेद या चिकीत्सा पद्धतीचा विकास झालेला होता.
गुप्तकाळातच वागभट्ट याने अष्टांग हृदय या आयुर्वेद ग्रंथाची निर्मीती केली.
नवनीतकम या आयुर्वेद ग्रंथाची निर्मीती गुप्तकाळातच झाली होती. नवनीतकम म्हणजे प्राचीन आयुर्वेदीक ग्रंथाचा सारांश होय.
धन्वंतरी हा प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य चंद्रगुप्त द्वितीय विक्रमादीत्याच्या दरबारातील नवरत्नां पैकी एक होता. धन्वंतरीस देवांचा वैद्य म्हणून सुद्धा संबोधीत करतात. धन्वंतरीने रोग निदान, वैद्य चिंतामणि, विद्याप्रकाश चिकित्सा, धन्वंतरीनिघन्टु, वैद्यक भास्करोदय व चिकित्सा सार संग्रह हे आयुर्वेदीक ग्रंथ लिहीलेत.
गुप्तकाळातच पाॅल काॅप्य या पशु चिकीत्सकाने हस्त्यायुर्वेद या हत्ती वरील आयुर्वेदीक उपचार पद्धतीवर ग्रंथ लिहीला.
त्याच प्रमाणे शलिहोत्र ऋषिने अश्वशास्त्र नामक ग्रंथ घोडयावरील आयुर्वेदीक उपचार पद्धतीवर लिहीला.

**3.9 गुप्त कालीन धातू विज्ञान शास्त्रातील प्रगती:**
गुप्तकाळात धातू विज्ञान शास्त्रात अभूतपुर्व प्रगती झाली होती. याचे उदाहरण म्हणजे चंद्रगुप्त द्वितीय विक्रमादीत्य याचा दिल्लीतील महरोली येथे असलेला लोहस्तंभ होय. हा लोहस्तंभ शुद्ध लोखंडाचा असून 1600 वर्षांपासून कधीही जंगला नाही.
गुप्तकाळात नागार्जून नामक धातूशास्त्रीने सोना, चांदी, तांबा व लोह या धातूंमध्ये रोगप्रतिकारक क्षमता असल्याचे सिद्ध केले होते.
नागार्जून याने पा–याचा शोध सुद्धा लावला होता.
नागार्जून याने रस रत्नाकर, लौहशास्त्र, आरोग्य मंजरी, सिद्ध नागार्जून, योगरस, रसेन्द्र मंगल इत्यादी ग्रंथांची निर्मीती केली होती.
या वरून सिद्ध होते की गुप्त काळात धातूशास्त्रात अभूतपुर्व प्रगती झाली होती.

**4. निष्कर्ष:**
सुवर्ण युग त्या काळास म्हणतात ज्याकाळात देशातील केंद्रीय शासकाचा त्या देशातील विस्तृत प्रदेशावर किंवा भूप्रदेशावर अधिकार असतो. असे शासक दिर्घ काळाकरीता देशावर राज्य करीतात व या काळात विदेशी शत्रूं पासून देशाचे रक्षण करण्यास पात्र असतात. शिवाय आपल्या देशातील जनतेचे पालनकर्ते बनतात व देशाला प्रत्येक क्षेत्रात पुढे नेण्याकरीता प्रयत्न करीत असतात व जनतेला प्रोत्साहन देतात. अशाच शासकांच्या काळात देशातील जनता सुखी, समाधानी असते व प्रत्येक क्षेत्रात जसे कला, साहित्य, धर्म, विज्ञान ... इ. मध्ये देशाची अविश्वसनीय प्रगती होते.
भारताच्या इतिहासात अनेक राजवंशांनी भारतीय भूप्रदेशावर राज्य केले. मात्र यात काहीच राजवंश अशी होती की ज्यांनी भारतातील मोठया भूप्रदेशावर राज्य केले व त्यांचे साम्राज्य हे विशाल साम्राज्य म्हणून प्रसिद्ध झाले. यात प्रचिन काळची मौर्य राजवंश, गुप्त राजवंश, प्रतिहार राजवंश, चोल राजवंश, चालूक्य राजवंश, राष्ट्रकुट राजवंश, पाल

राजवंश, वर्धन राजवंश ही प्रसिद्ध होती. तर मध्ययुगीन काळची गुलाम वंश, खिलजी वंश, तुगलक वंश, लोदी वंश, मुगल वंश ... इत्यादी. यातील काहीच राजवंशांचा साम्राज्य विस्तार हा उत्तर व दक्षिण भारतातील विस्तृत प्रदेशावर होता व ती दिर्घ काळ राज्य करू शकलीत. ते साम्राज्य म्हणजे गुप्त साम्राज्य व मुगल साम्राज्य होय. यातील मुगल साम्राज्यात बादशहा अकबर हा एकमेव धर्मसहिष्णू शासक होता. मात्र बाकी शासक धार्मिक असहिष्णू होते. मुगलांच्या काळात स्थापत्य कलेचा विकास बादशहा शहाजहानच्या काळात झाला. मा्त्र मुगल काळात (बादशहा अकबर चा काळ वगळता) सर्वसाधारण जनतेवर अत्याचार वाढले. मात्र भारतीय इतिहासात फक्त गुप्त काळच असा होता की ज्या काळात गुप्त सम्राटांनी आपल्या शौर्याने विशाल साम्राज्याचे रक्षण केले. शिवाय गुप्त सम्राटांची प्रशासकीय व्यवस्था अतिशय उत्तम व जनतेसाठी हितकारी होती. त्यामुळे राज्यातील जनता सुखी होती. शिवाय गुप्त सम्राटांनी आपल्या राज्यात प्रत्येक कलेला व कलाकारांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे भारताच्या इतिहासात एकदाच सुवर्ण युग आले व ते गुप्त सम्राटांच्या काळात.

## संदर्भ सूची:


1. एन्शंट इंडिया प्राचिन भारत, मूळ लेखक - प्रा. आर. एस. शर्मा, मराठी अनुवाद - वासंती फडके, संस्करण - के'सागर पब्लिकेशन्स.
2. हिस्टरी ऑफ एन्शंट इंडिया, मूळ लेखक - जे. एल. मेहता व सरिता मेहता, मराठी अनुवाद - एम. व्ही. काळे, संस्करण - के'सागर पब्लिकेशन्स.
3. वी. डी. महाजन : 'प्रचिन भारत का इतिहास', संस्करण - एस. चान्द.
4. रमेशचंद्र मजूमदार : 'प्रचिन भारत',
5. Radhakumud Mookerji : The Gupta Empire.
6. Web Site : https://en.wikipedia.org › wiki › Gupta_Empire